| 72 | तक्रार क्र. 240 श्री. सुनील अग्रवाल<br>Massive destruction of M angroves, Illegal CRZ encroachment & debris Dumping at Ulwe node Sector 2, 5, 6, 20, 21, 22, 23<br>दिनांक 25.05.2023 | • सदस्य सचिव तथा उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई यांचेमार्फत दिनांक 16.06.2023 रोजीच्या पत्रान्वये स्थळपाहणी अहवाल संबंधित अधिकारी यांचेकडून मागविण्यात आला होता.<br>• त्याअनुषंगाने जिल्हाधिकारी रायगड यांचे दि. 13.07.2023 रोजीच्या अहवालानूसार सेक्टर 22 वगळता सेक्टर 2,5,6,20,21,23 येथे प्लॉटींग झाले असून पुर्णत: लोकवस्ती आहे. वरील सेक्टर मध्ये कोठेही कांदळवन क्षेत्र नाही. सेक्टर 22 मध्ये लोकवस्ती नाही. तसेच सदरची जागा ही मोकळी आहे. वर नमूद 2,5,6,20,21,23 ची स्थळपाहणी केली असता कांदळवन वनस्पतीची तोड झाल्याचे निर्देशनास आले नसल्याचे नमूद केले आहे. | 1. व्यवस्थापकीय संचालक, सिडको |
| 73 | तक्रार क्र. 242 श्री. बी. एन. कुमार<br>CRZ Violation at Ulwe for Tirupati Balaji Temple at Plot No. 3 Sector 12, Ulwe node, Tal. Panvel and Dist. Raigad by M/s Tirumala Tirupati Devasthanam.<br>दिनांक 31.05.2023 | • सदस्य सचिव तथा उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई यांचे मार्फत दिनांक 06.06.2023 रोजीच्या पत्रान्वये स्थळपाहणी अहवाल संबंधित अधिकारी यांचेकडून मागविण्यात आला होता.<br>• त्याअनुषंगाने जिल्हाधिकारी रायगड यांचे अहवालानूसार प्लॉट नं. 3 सेक्टर 12 उलवे नोड ता.पनवेल या जमीनीवर सद्यस्थितीत एल.अॅन्ड टी कंपनीचे मशीन, रेडिमीक्स, प्लॅन्ट, गाडया हायवा, पोकलन पार्किंग, तिरुपती मंदिर जागेवर आहे. जागेच्या पश्चिमेला न्हावा शिवडी रस्ता आहे. जागेवर आज स्थितीला कांदळवन तोड झालेली नसल्याचे नमूद केले आहे. | 1. व्यवस्थापकीय संचालक, सिडको |
| 74 | तक्रार क्र. 253 श्री. प्रदीप पाटोळे<br>Enchrochment in Mangroves by Nisarg Udyan and Dumping Department. दि.09.07.2023. | • सदस्य सचिव तथा उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई यांचेमार्फत दिनांक 18.07.2023 रोजीच्या पत्रान्वये स्थळपाहणी अहवाल संबंधित अधिकारी यांचेकडून मागविण्यात आला होता. तथापी, अहवाल अप्राप्त आहे. | 1. जिल्हाधिकारी रायगड<br>2. नवी मुंबई महानगरपालिका<br>3. सिडको |
| 75 | तक्रार क्र.258 Roadpali Resodents Welfare Association.<br>Illegal Temple have been developed दि.29.07.2023 | • सदस्य सचिव तथा उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई यांचेमार्फत दिनांक 09.08.2023 रोजीच्या पत्रान्वये स्थळपाहणी अहवाल संबंधित अधिकारी यांचेकडून मागविण्यात आला होता. तथापी, अहवाल अप्राप्त आहे. | 1. व्यवस्थापकीय संचालक, सिडको<br>2. पनवेल महानगरपालिका<br>3. जिल्हाधिकारी |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | रायगड |

| अ.क्र | तक्रारदार व तक्रारीचा विषय | सविस्तर तपशील | कार्यवाही करणारी यंत्रणा |
|---|---|---|---|
| | **पालघर जिल्हयातील कांदळवन तक्रारी** | | |
| 76 | तक्रार क्र. 134 श्रीमती श्वेता भट दि.11.05.2020 Destruction of mangroves at Sasunavghar, Vasai, Palghar. | • मा.अध्यक्षांनी जिल्हाधिकारी पालघर यांना उचित कार्यवाही करुन पुढील बैठकीपूर्वी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते. | 1. जिल्हाधिकारी पालघर |
| 77 | तक्रार क्र. 189 श्री. भरत पाटील, दि. 19.05.2022<br>कांदळवनाची बेकायदेशीर कत्तल होत असल्याबाबत. | • वसई विरार शहर महानगरपालिका यांच्या दि.12.04.2023 रोजीच्या अहवालानूसार प्रभाग समिती 'जी' वालीव कार्यक्षेत्रातील गाव मौजे ससुनवघर स.न.100, 193 नायगाव (पूर्व) येथे पाहणी केली असता सदर जागेत नगररचना विभागाकडील परवानगी बाबतचे VVCMC/TP/CC/VP-6475/97/2022-23 Date.30.06.2022 फलक आढळून आले तसेच उर्वरित जागेवर बांधकाम झाल्याचे दिसून येत नसल्याचे नमूद केले आहे.<br>• मा.अध्यक्षांनी उपवनसंरक्षक डहाणू वन विभाग यांना उचित कार्यवाही करुन पुढील बैठकीपूर्वी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते. | 1. वसई-विरार महानगरपालिका<br>2. उपवनसंरक्षक डहाणू वन विभाग |
| 78 | तक्रार क्र.208 श्री.निलेश वर्तक व श्री.अमर म्हात्रे यांच्या वसईतील रानगावात शासकीय जागेवर कांदळवनाची तोड होत असल्याच्यातक्रारीबाबत.<br>दि.18.01.2023 | • मा.अध्यक्षांनी जिल्हाधिकारी पालघर, उपवनसंरक्षक डहाणू वन विभाग यांना उचित कार्यवाही करुन पुढील बैठकीपूर्वी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते. | 1. जिल्हाधिकारी पालघर<br>2. उपवनसंरक्षक डहाणू वन विभाग |
| 79 | तक्रार क्र.220 श्री.महेश भोईर तिवरांच्या झाडांची कत्तल करुन जागेवर माती आणि अनधिकृत बांधकाम केलेबाबत तक्रार.<br>दि. 21.03.2023 | • मा.अध्यक्षांनी जिल्हाधिकारी पालघर, वसई विरार महानगरपालिका, उपवनसंरक्षक डहाणू यांना उचित कार्यवाही करुन पुढील बैठकीपूर्वी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते. | 1. वसई-विरार महानगरपालिका<br>2.जिल्हाधिकारी पालघर<br>3. उपवनसंरक्षक डहाणू |
| 80 | तक्रार क्र.222 श्री.मेकॅन्झी डाबरे व श्री.जॉय जोसेफ फरगोज<br>घोडबंदर ते ससूनवघर दरम्यान पाणथळ जमिनीवरील प्रचंड मोठया प्रमाणात कांदळवनाची तोड करुन भराव घातला जात असल्याबाबत.<br>दि. 14.03.2023 | • मा.अध्यक्षांनी जिल्हाधिकारी पालघर, वसई विरार महानगरपालिका, उपवनसंरक्षक डहाणू यांना उचित कार्यवाही करुन पुढील बैठकीपूर्वी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते. | 1. वसई विरार शहर मनपा<br>2. जिल्हाधिकारी पालघर<br>3. उपवनसंरक्षक डहाणू वन विभाग |

| | | | |
|---|---|---|---|
| 81 | तक्रार क्र. 241 श्री. दिनेश गोसावी परिवर्तन संघटना पालघर<br>Complaint regarding Destruction of Mangroves.<br>दिनांक 29.05.2023 | • सदस्य सचिव तथा उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई यांचेमार्फत जा.क्र. 56 दिनांक 06.06.2023 रोजीच्या पत्रान्वये स्थळपाहणी अहवाल संबंधित अधिकारी यांचेकडून मागविण्यात आला होता. तथापी, अहवाल अप्राप्त आहे. | 1. वसई-विरार महानगरपालिका<br>2. जिल्हाधिकारी पालघर<br>3. उप वनसंरक्षक डहाण वनविभाग, पालघर |
| 82 | तक्रार क्र. 243 श्री. चंदू विजय पाटील<br>मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गालगत नायगाव जुचंद्र येथील वसई खाडीपात्राच्या जमीनीवरील ॲग्रोसर्ग इरिडेटर्स इंडिया प्रा. लि. कारखान्यास देण्यात आलेली परवानगी रद्द करीत पर्यावरणाचा ऱ्हास होत असल्याप्रकरणी सदर कारखाना तात्काळ बंद करण्यात येणेबाबत. | • सदस्य सचिव तथा उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई यांचेमार्फत जा.क्र. 129 दिनांक 21.06.2023 रोजीच्या पत्रान्वये स्थळपाहणी अहवाल संबंधित अधिकारी यांचेकडून मागविण्यात आला होता. तथापी, अहवाल अप्राप्त आहे. | 1. वसई-विरार महानगरपालिका<br>2. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई<br>3. जिल्हाधिकारी पालघर |
| 83 | तक्रार क्र. 244 श्री. रामअवतार जिनु यादव दिनांक 04.06.2023<br>सर्वे नंबर – 283 / 284 जुचंद्र तालुका – वसई जिल्हा पालघर भूमि पर कांदलवन झाड नष्ट करनेवाले माफिया लोगो पर गुन्हा दाखल करने से संबंधित. | • सदस्य सचिव तथा उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई यांचेमार्फत दिनांक 21.06.2023 रोजीच्या पत्रान्वये स्थळपाहणी अहवाल संबंधित अधिकारी यांचेकडून मागविण्यात आला होता. तथापी, अहवाल अप्राप्त आहे. | 1. वसई-विरार महानगरपालिका<br>2. जिल्हाधिकारी पालघर |
| 84 | तक्रार क्र.248 श्री. कैलास चव्हाण सर्व्हे क्र.248, ज्युचंद्र मौजे या मिळकतीवर यालगत 24 एकर मिळकतीवर कैलास द्वारकानाथ म्हात्रे (भुमाफिया) व यांचे 20 ते 25 सहकारी भुमाफिया व गुंड यांनी हजारो कांदळवनाच्या झाडाची कत्तल करुन 80 ते 90 हजार ब्रासचे गौणखनिज (माती, दगड, मुरुम) बाहेरुन वाहतूक आणून मोठ-मोठे तलाव भराव करुन या मिळकतीवर केलेल्या भरणीची शासनाची कोणतीही पुर्व परवानगी घेतली नाही आणि 2000 पक्के बांधकाम करुन चाळी बनवित आहेत, हे पक्के बांधकाम तात्काळ निष्कासन करावे व जमीन कब्जा केल्याचा दंड व गुन्हा दाखल करण्याचे आदेश द्यावेत | • सदस्य सचिव तथा उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई यांचेमार्फत दिनांक 12.07.2023 रोजीच्या पत्रान्वये स्थळपाहणी अहवाल संबंधित अधिकारी यांचेकडून मागविण्यात आला होता. तथापी, अहवाल अप्राप्त आहे. | 1. वसई-विरार महानगरपालिका<br>2. जिल्हाधिकारी पालघर |

| | | | |
|---|---|---|---|
| | याबाबत तक्रार अर्ज. दि.28.05.2023 | | |
| 85 | तक्रार क्र. 249 श्री. मॅकेन्झी डाबरे जिल्हा पालघर, तालुका वसई येथील पाणथळ, खाजण, कांदळवन जमीन बाधित होत असल्याबाबत. दि.28.06.2023. | • सदस्य सचिव तथा उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई यांचेमार्फत दिनांक 12.07.2023 रोजीच्या पत्रान्वये स्थळपाहणी अहवाल संबंधित अधिकारी यांचेकडून मागविण्यात आला होता. तथापी, अहवाल अप्राप्त आहे. | 1. जिल्हाधिकारी पालघर<br>2. वसई-विरार महानगरपालिका<br>3. उप वनसंरक्षक, डहाणू वन विभाग |

| अ.क्र | तक्रारदार व तक्रारीचा विषय | सविस्तर तपशील | कार्यवाही करणारी यंत्रणा |
|---|---|---|---|
| | | **सिंधुदुर्ग जिल्हयातील कांदळवन तक्रार** | |
| 86 | तक्रार क्र. 190 श्री. दत्तराज चव्हाण व श्री. कपिल चव्हाण दि.03.06.2022 कांदळवन तोडी बाबत गंभीर गुन्हा मोजे तारकर्ले गावातील रांजनाला येथे झाला असून त्याबाबत तात्काळ कार्यवाही करावी सोबत फोटो आणि तक्रार अर्ज सादर करत आहे. | • मा.अध्यक्षांनी जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग, उपवनसंरक्षक सावंतवाडी यांना उचित कार्यवाही करुन पुढील बैठकीपूर्वी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते.<br>• त्याअनुषंगाने जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांचे दि.17.07.2023 रोजीच्या अहवालानूसार प्रथमदर्शनी भराव टाकलेल्या क्षेत्रात कांदळवन प्रजाती होत्या की नाही, हे निश्चित सांगता येत नाही. परंतु भरावाच्या ठिकाणापासून सुमारे 30 ते 35 मीटर अंतरावर कांदळवन सदृष्य वनस्पती दिसून येत असल्याबाबत सदस्य सचिव तथा वनक्षेत्रपाल कुडाळ यांनी अहवाल सादर केलेला आहे. मा. उच्च न्यायालयाकडील जनहित याचिका क्र. 87/2006 चे आदेशामधील मु.क्र. A(iii) नुसार खारफुटीचे क्षेत्रापासून 50 मीटर पर्यंतचे क्षेत्र मोकळे ठेवणे आवश्यक आहे. त्यानुसार उक्त आदेशामधील सुचनांचा भंग झालेला असल्याचे नमूद केले आहे.<br>• तथापि पर्यावरण (संरक्षण) अधिनियम 1986 च्या तरतुदी आणि नियम, आदेश आणि निर्देश यांचे उल्लंघन चे कलम 15 प्रमाणे FIR No.0149/2023 दि.06.07.2023 मालवण पोलीस ठाणे, तालुका मालवण येथे अज्ञात व्यक्ती विरुध्द गुन्हा दाखल करणेत आलेला असल्याचे नमूद केले आहे. | 1. उपवनसंरक्षक सावंतवाडी |
| 87 | तक्रार क्र.226 श्री.ओंकार केणी मालवणी सागरी महामार्ग दुतर्फा असलेल्या कांदळवन परिसरात टाकण्यात येणाऱ्या कचऱ्यावर न्यायालयाच्या आदेशानुसार कारवाई करण्याबाबत. | • मा.अध्यक्षांनी जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग, उपवनसंरक्षक सावंतवाडी यांना उचित कार्यवाही करुन पुढील बैठकीपूर्वी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते.<br>• त्याअनुषंगाने जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांचे दि.12.07.2023 रोजीच्या अहवालानूसार प्रत्यक्ष | 1. उपवनसंरक्षक सावंतवाडी |

| | | | |
|---|---|---|---|
| | दि. 11.04.2023 | स्थळपाहणी वेळी कांदळवन क्षेत्राजवळ कचरा, झाडांचे बुंधे, बिल्डींगचा राडारोडा, डेब्रिज इत्यादी टाकलेले असल्याचे निदर्शनास आलेले आहे. रस्ता दुतर्फा टाकलेला प्लास्टीक व इतर कचरा तसेच भरावामुळे कांदळवन प्रजातीच्या झाडांना तसेच त्याचे पुनरुत्पादन / वाढीस धोका निर्माण होऊ शकतो असे नमूद केले आहे.<br>• तथापि पर्यावरण (संरक्षण) अधिनियम 1986 च्या तरतुदी आणि नियम, आदेश आणि निर्देश यांचे उल्लंघन चे कलम 15 प्रमाणे FIR No.0151/2023 दि.06.07.2023 मालवण पोलीस ठाणे, तालुका मालवण अज्ञात व्यक्ती विरुध्द गुन्हा दाखल करणेत आलेला असल्याचे नमूद केले आहे. | |

**(डॉ. महेंद्र कल्याणकर)**
**अध्यक्ष,**
**कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती**
**तथा विभागीय आयुक्त, कोकण विभाग**

**अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचे कार्यालय**

३०२, वेक फिल्ड हाऊस,३ रामजला, ब्रिटानियारेस्टोरंटजवळ, बॅलार्डइस्टेट, फोर्ट,मुंबई-४००००१.

दुरध्वनीक्र.०२२-२२६९४९८५/८४ Email:ccfmangrove@mahaforest.gov.in /ccfmmumbai@gmail.com

**विषय**:- कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीच्या 42 व्या बैठकीचे मंजूर इतिवृत्त.

जा.क्र.कक्ष-1/ल.ले/ 200 /सन 2023-24

फोर्ट, मुंबई 400 001 दिनांक: 23.08.2023

**प्रति,**

1. मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई.
2. मा. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई.
3. मा. जिल्हाधिकारी, मुंबई/ मुंबईउपनगर/ ठाणे/ पालघर / रायगड / रत्नागिरी / सिंधुदुर्ग.
4. मा. पोलिस आयुक्त, मुंबई/ठाणे.
   जिल्हा पोलीस अधिक्षक, ठाणे (ग्रामीण) /पालघर/ रायगड/ रत्नागिरी/ सिंधुदुर्ग.
5. मा. संचालक, पर्यावरण विभाग.
6. मा. अपर आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण विभाग.
7. मा. आयुक्त/ सहआयुक्त, महानगरपालिका (मुंबई / नवी मुंबई / ठाणे / मिरा भाईंदर/ वसई-विरार / कल्याण-डोंबविली / भिवंडी निझामपूर / उल्हासनगर.)
8. श्री. दयानंद स्टॅलिन, संचालक, वनशक्ती अशासकीय संस्था.
9. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ.
10. नगर रचना विभागाचे अधिकारी / CIDCO.
11. डॉ. महेश शिंदीकर, Applied dept of Science, College of Engineering Pune.

**संदर्भ** :- या कार्यालयचे पत्र जा.क्र.कक्ष-1/ल.ले/170/सन 2023-24 दि.25.07.2023.

उपरोक्त संदर्भान्वये विषयांकीत प्रकरणी कोकण विभागातील वेटलँड संदर्भात कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीची 42 **वी** बैठक, गुरुवार दिनांक 10.08.2023 रोजी **मा. अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे अध्यक्षतेखाली** घेण्यात आली होती.

सदर बैठकीचे मंजूर इतिवृत्त आपणास माहिती व पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे. तरी, कृपया अवलोकन होणेस विनंती आहे.

Anitta Patil 23/8/23

**(अनिता पाटील)**
**सदस्य सचिव**
**कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती**
**तथा उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई**

**सोबत : बैठकीचे इतिवृत्त.**

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचे कार्यालय
३०२, वेक फिल्ड हाऊस,३ रामजला, ब्रिटानियारेस्टोरंटजवळ, बॅलार्डइस्टेट, फोर्ट,मुंबई-४००००१.
दुरध्वनीक्र.०२२-२२६१४९८५/८४ Email:ccfmangrove@mahaforest.gov.in /ccfmmumbai@gmail.com

**विषय:- कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीच्या बैठकीच्या इतिवृत्तास मंजूरी मिळणेबाबत.**

जा.क्र./ल. ले/ 196 /सन 2023-24
फोर्ट, मुंबई 400001 दिनांक- 21.08.2023

**प्रति,**

**मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग,**
**तथा अध्यक्ष,**
**कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती.**

**संदर्भ:- कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीची 42 वी बैठक दि.10.08.2023.**

**महोदय,**

उपरोक्त संदर्भान्वये कोकण पाणथळ तक्रार निवारण **समितीची 42 वी बैठक दि.10.08.2023** रोजी आपले अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. सदर बैठकीचे इतिवृत्त तयार करुन मंजूरीसाठी पाठविण्यात येत आहे.

तरी, कोंकण पाणथळ तक्रार निवारण समितीच्या बैठकीच्या इतिवृत्तास मंजूरी मिळणेस विनंती आहे.

21/8/23

**(अनिता पाटील)**
**सदस्य सचिव**
**कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती**
**तथा उपवनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई**

**सोबत:- बैठकीचे इतिवृत्त.**

## कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीची 42 वी बैठक
## दि.10.08.2023 रोजीचे इतिवृत्त
## मा. विभागीय आयुक्त यांचे कार्यालय, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई.

कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीची 42 वी बैठक समितीचे अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त, कोकण विभाग तसेच समितीचे सह-अध्यक्ष तथा अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. समितीच्या सदस्य सचिव यांनी उपस्थितांचे स्वागत केले व मा. अध्यक्ष यांच्या अनुमतीने समितीच्या कामकाजास सुरुवात झाली. सदर बैठकीस खालील नमूद अधिकारी व कर्मचारी व्यक्तीश: अथवा व्हि. सी. द्वारे उपस्थित होते.

| अ.क्र. | नाव | पद | कार्यालय |
|---|---|---|---|
| 1. | श्री. महेंद्र कल्याणकर | अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त कोकण विभाग | विभागीय आयुक्त कोकण, कोकण भवन |
| 2. | श्री. एस. व्ही. रामाराव | सह अध्यक्ष तथा अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कांदळवन कक्ष), मुंबई | कांदळवन कक्ष, मुंबई |
| 3. | मुख्य वन संरक्षक प्रादेशिक, ठाणे (व्ही.सी.द्वारे) | मुख्य वनसंरक्षक प्रादेशिक यांचे प्रतिनिधी | मुख्य वनसंरक्षक प्रादेशिक, ठाणे यांचे कार्यालय |
| 4. | श्री. विवेक गायकवाड | उप आयुक्त (महसूल), कोकण विभाग | विभागीय आयुक्तांचे कार्यालय, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई |
| 5. | श्री.अशोक शिनगारे | जिल्हाधिकारी ठाणे | जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे |
| 6. | श्रीमती अनिता पाटील | सदस्य सचिव तथा उप वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई | कांदळवन कक्ष, मुंबई |
| 7. | श्री.एम.देवेंद्र सिंग | जिल्हाधिकारी, रत्नागिरी (व्ही.सी.द्वारे) | जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी |
| 8. | श्रीमती के. मंजुलक्ष्मी | जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग (व्ही.सी.द्वारे) | जिल्हाधिकारी कार्यालय, सिंधुदुर्ग |
| 9. | श्री.एस.एन.रेड्डी | उप वनसंरक्षक, सावंतवाडी (व्ही.सी.द्वारे) | उप वनसंरक्षक, सावंतवाडी |
| 10. | श्री. चंद्रकांत विभूते (व्ही.सी.द्वारे) | उपसचिव, पर्यावरण व वातावरणीय विभाग (पाणथळ प्रतिनिधी | पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, मंत्रालय (MCZMA) |
| 11. | श्री. विशाल मदने (व्ही.सी.द्वारे) | अवर सचिव, पर्यावरण व वातावरणीय विभाग (कांदळवन प्रतिनिधी) | पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, मंत्रालय (MCZMA) |
| 12. | श्री. तुषार जी. शिंदे | संचालक, (व्ही.सी.द्वारे) | एम.एम.आर.डी.ए. (MMRDA) |
| 13. | श्री. धनाजीराव धायगुडे | जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख | जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर |
| 14. | श्री. संजय शिंदे | उप-आयुक्त, (व्ही.सी.द्वारे) | मिरा-भाईंदर महानगरपालिका |
| 15. | श्रीमती अनघा कदम | उपायुक्त ठाणे मनपा (पी.सी.ओ) | ठाणे महानगरपालिका |
| 16. | श्री.अभिषेक पराडकर | उपायुक्त पनवेल | पनवेल महानगरपालिका |
| 17. | डॉ. सागर घोलप | उपायुक्त, वसई विरार मनपा | वसई विरार महानगरपालिका |
| 18. | श्री. भागवत गावंडे | उप विभागीय अधिकारी | जिल्हाधिकारी मुंबई उपनगर |
| 19. | श्री. सुदाम परदेशी | निवासी उपजिल्हाधिकारी, ठाणे | जिल्हाधिकारी ठाणे |
| 20. | श्री. मच्छिंद्र सुकटे (व्ही.सी.द्वारे) | निवासी उपजिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग | जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग |
| 21. | श्री. सुभाष भागडे (व्ही.सी.द्वारे) | निवासी उपजिल्हाधिकारी, पालघर | जिल्हाधिकारी पालघर |
| 22. | श्री.राहुल एकनाथ मुंडके | उप विभागीय अधिकारी, (SDO) पनवेल | जिल्हाधिकारी रायगड यांचे प्रतिनिधी |

| | | | |
|---|---|---|---|
| 23. | श्री. प्रविण साळुंखे | मुख्य वास्तुविशारद व नियोजनकार | म्हाडा |
| 24. | श्री. जगदीश पाटील | वरिष्ठ नियोजनकार (पर्यावरण), सिडको | सिडको कार्यालय (CIDCO) |
| 25. | श्रीमती मनिषा प्रधान | मुख्य पर्यावरण अधिकारी, ठाणे | ठाणे महानगरपालिका |
| 26. | श्री. तन्मय बोरे (व्ही.सी.द्वारे) | नगररचना कार्यकारी अभियंता | वसई-विरार शहर महानगरपालिका |
| 27. | श्री. पुरुषोत्तम जाधव | उप वास्तुविशारद, एमआयडीसी | एमआयडीसी (MIDC) |
| 28. | श्री. अतुल झेंडे | अपर पोलिस अधिक्षक, रायगड | कार्यालय पोलिस अधिक्षक, रायगड |
| 29. | श्री. नितिन विजयकर | पोलीस निरीक्षक | ठाणे ग्रामीण एस.पी. |
| 30. | उप निबंधक अधिकारी | (S.R.O) रत्नागिरी प्रतिनिधी (व्ही.सी.द्वारे) | - |
| 31. | उप निबंधक अधिकारी | (S.R.O) चिपळूण प्रतिनिधी (व्ही.सी.द्वारे) | - |
| 32. | ए.पी.आय.डी.आर.माने | मुंबई शहर | मुंबई सीपी ऑफिस |
| 33. | श्री. माजेद शेख | उप-अभियंता (बी.एम.सी.) | बी.एम.सी. मालाड(प.) |
| 34. | श्री. गौरव हिंगणे | सहायक कार्यकारी अभियंता | महाव्यवस्थापक (वने) सिडको |
| 35. | श्रीम. सुवर्णा जाधव | फील्ड ऑफीसर | महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, ठाणे. |
| 36. | श्री. संजय केनी | पर्यावरण निरीक्षक | बी.एन.सी.एम.सी. |
| 37. | श्रीम. दिपाली खन्ना | सहायक पोलिस आयुक्त,एम.बी.व्ही.व्ही. | - |
| 38. | श्री. जितेंद्र जगदाळे | सहायक पोलिस आयुक्त, ठाणे शहर | सहायक पोलिस आयुक्त, ठाणे शहर |
| 39. | श्री. धनाजी क्षिरसागर | सहायक पोलिस आयुक्त | - |
| 40. | श्री. संदिप यादव | पोलिस उपनिरीक्षक | - |
| 41. | श्री. भारत पॉल | पोलिस उपनिरीक्षक | एम.एच.बी.पोलिस स्टेशन, मुंबई |
| 42. | श्री. मारूती हिरवे | पोलिस उपनिरीक्षक | चारकोप पोलिस स्टेशन, मुंबई |
| 43. | श्री. व्ही. के. गांधी | प्रतिनिधी (व्ही.सी.द्वारे) | नवी मुंबई एन्व्हारमेंट प्रिझर्वेशन सो. |
| 44. | श्री. राहुल खोत | उप संचालक | बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी |
| 45. | श्री. स्टॅलिन डी. | संचालक, वनशक्ती | वनशक्ती |
| 46. | श्रीमती. हेमा रमाणी | बी.ई.ए.जी. | बॉम्बे एन्व्हारमेंट ॲक्शन ग्रुप |
| 47. | श्री. प्रतिक भोसले | प्रतिनिधी (व्ही.सी.द्वारे) | एम.एम.आर.डी.ए. (MMRDA) |
| 48. | अतिरीक्त एस.पी.रत्नागिरी | प्रतिनिधी (व्ही.सी.द्वारे) | - |
| 49 | श्री.रणजीत कुमार | प्रतिनिधी | - |
| 50 | श्री. प्रशांत पानवेलकर | प्रतिनिधी (व्ही.सी.द्वारे) | - |
| 51 | श्री. अमोल गवई | सहायक पोलीस निरीक्षक, पालघर | - |
| 52 | सॉल्ट पॅन विभाग | प्रतिनिधी (व्ही.सी.द्वारे) | सॉल्ट पॅन विभाग, बलार्ड इस्टेट, मुंबई |
| * | बृहन्मुंबई महानगरपालिका | अनुपस्थित | |
| * | महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ (MPCB) | अनुपस्थित | |

❖ व्हि.सी. मधील उपस्थित काही सदस्यांचे नाम / पदनामाचा बोध होत नसल्यामुळे फक्त नावांची नोंद केलेली आहे.

| अ.क्र | विषय | करावयाची कार्यवाही |
|---|---|---|
| 1 | महानगरपालिके अंतर्गत पाणथळ तक्रार निवारण समिती गठीत करणेबाबत व समितीच्या दरमहा बैठका घेणेबाबत. | • बृहन्मुंबई, नवी मुंबई, वसई-विरार, कल्याण-डोंबिवली, भिवंडी-निझामपूर, उल्हासनगर महानगरपालिका यांची समिती गठीत केले बाबतची माहिती या समितीस प्राप्त झाली नाही तथापि शासन निर्णयात महानगरपालिकेतील समिती गठीत करण्याबाबत सूचना नसल्याने याबाबत मा.अध्यक्ष यांनी यासंबंधी चर्चा करुन निर्णय घेण्यात येईल असे सांगितले. |
| 2 | नोडल अधिकाऱ्यांच्या उपस्थितीबाबत | • मा. उच्च न्यायालय यांनी दिलेल्या आदेशांचे पालन होण्याच्या दृष्टिने तसेच सर्व तक्रारींचे निराकरण होण्यासाठी सर्व नोडल अधिकाऱ्यांनी बैठकीस उपस्थित राहून त्यांच्या कार्यालयाशी संबंधित माहिती समितीला देण्याच्या सूचना दिल्या.<br>• तसेच मा.अध्यक्ष यांनी कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीची विशेष बैठक दि.01.09.2023 रोजी आयोजित करण्याच्या सूचना दिल्या. |
| 3 | पाणथळ तक्रार निवारण समितीसाठी टोल फ्री क्रमांक सुरु करणेबाबत. | • जिल्हाधिकारी मुंबई शहर, ठाणे, रायगड आणि पालघर यांनी यांचे कार्यालयाकरिता संबंधित कार्यालयाने टोल फ्री क्रमांक कार्यान्वित करुन त्यांची माहिती समितीच्या सदस्य सचिवांकडे देण्याच्या सूचना दिल्या. |
| 4 | डेब्रिस हटवून इतरत्र निश्चित ठिकाणी टाकण्याबाबत. | • या अनुषंगाने समितीचे सह अध्यक्ष तथा अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कांदळवन कक्ष), मुंबई यांनी खाली नमूद पाच टप्प्यानूसार संबंधित यंत्रणांनी कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या.<br>1. सद्यस्थितीत जिल्हाधिकारी (महसूल) अथवा महानगरपालिका अथवा संबंधित यंत्रणा यांच्या कार्यक्षेत्रात असलेल्या डेब्रिजच्या जागेची संयुक्त पाहणी संबंधित विभागाचे नोडल अधिकारी / प्रतिनिधी (तहसलिदार/सहायक आयुक्त/वनपरिक्षेत्र अधिकारी) आणि समितीचे अशासकीय सदस्य यांनी करावी. यासाठी संबंधित जिल्हाधिकारी महसूल यांनी आवश्यकते नियोजन करावे.<br>2. डेब्रिजचे आकारमान (Quantification) निश्चित करणे.<br>3. डेब्रिज हटविल्यानंतर टाकण्यासाठी पर्यायी जागा.<br>4. डेब्रिज हटविण्यासाठीचे नियोजन व कार्यवाही.<br>5. डेब्रिज हटविल्यानंतर सदर जागेवर कांदळवनाची पुर्नलागवड (Restoration) करणे.<br>• सदर विषयाच्या चर्चे दरम्यान मा. अध्यक्ष यांनी सर्व संबंधित महानगरपालिका यांना त्यांचे कार्यक्षेत्रात झालेला भराव, डेब्रिज हटविण्याबाबत करण्यात येणारे व्यवस्थापन व नियोजनाबाबतचे सादरीकरण (PPT) समितीकडे पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याच्या सूचना दिल्या. |
| 5 | कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती अंतर्गत प्राप्त तक्रारींमध्ये ठाणे जिल्हयातील खारीगाव टोल नाका परिसरातील पाणथळ जागेत भराव टाकण्यासंदर्भातील तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी ठाणे यांनी पुढील बैठकीत माहिती सादर करण्याची सूचना मा.अध्यक्ष यांनी दिली. | |

(डॉ. महेंद्र कल्याणकर)
**अध्यक्ष,**
**कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती**
**तथा विभागीय आयुक्त, कोकण विभाग**

## कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीकडे प्राप्त तक्रारींवरील कार्यवाहीचा तपशील

| अ.क्र | तक्रार क्र. व तक्रारीचा विषय | करावयाची कार्यवाही | कार्यवाही करणारी यंत्रणा |
|---|---|---|---|
| | | **मुंबई उपनगर जिल्हयातील कांदळवन तक्रारी** | |
| 1 | **श्री. स्टॅलीन डी. (WC- 73)**<br>Destruction of wetlands & near Bhakti Park Mono Rail station & nearby areas in Wadala.<br>दि. 31.01.2019 | • उपनमक आयुक्त कार्यालय, बेलार्ड ईस्टेट, मुंबई यांच्या दि.14.10.2022 रोजीच्या अहवालानूसार वडाळा सॉल्ट पॅन विभागातील, सॉल्ट पॅन जमीन ही भारत शासनाच्या अखत्यारीत आहे. सदर अहवालानूसार डेब्रिज हटवण्याची कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून (MCGM) करण्यात यावी. त्यासंदर्भात त्यांच्याशी अनेकदा पत्रव्यवहार करण्यात आला आहे, परंतु अद्यापही त्यांच्यामार्फत तक्रारीच्या अनुषंगाने कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.<br>• मीठ उपअधीक्षक, वडाळा यांचे मार्फत वडाळा पोलीस स्टेशनमध्ये FIR No. 265/2020 व No. 358/2021 अन्वये गुन्हा दाखल करण्यात येऊन, पोलीसांद्वारे पुढील कार्यवाहीच्या प्रतिक्षेत आहे. तसेच कांदळवन कक्षाद्वारे गुन्हेगारांविरुध्द FIR दाखल करण्यात यावी असे सूचित केले आहे. मात्र, अशा बेकायदेशीर कामांवर कारवाई करण्यासाठी मिठागरे विभागामार्फत आवश्यक ती पावले उचलत आहोत. जून 2022 मध्ये, MCGM आणि वन विभागाच्या मदतीने (कांदळवन कक्ष) वडाळा येथे जमीनदोस्त करण्याची मोहीम राबविण्यात आली असल्याचे नमूद केले आहे.<br>• तदनुसार मा.अध्यक्षांनी संबंधित यंत्रणा यांना सदर क्षेत्रात झालेली भरणी काढून टाकून जागा पुर्ववत करण्याचे निर्देश संबंधीत यंत्रणेला दिले. | 1. उपनमक आयुक्त कार्यालय, मुंबई<br>2. बृहन्मुंबई महानगरपालिका |
| 2 | **श्री.स्टॅलिन डी. (WC-109)**<br>Request for restoration of Culvem lake Gorai and also action against destroyers of wetlands.<br>दि. 15.04.2023 | • मा.अध्यक्षांनी जिल्हाधिकारी मुंबई उपनगर व विभागीय वन अधिकारी यांना पुढील बैठकीपूर्वी या तक्रारीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. | 1.जिल्हाधिकारी मुंबई उपनगर<br>2. विभागीय वन अधिकारी |
| 3 | **श्री. हरिष पांडे (WC-110)**<br>Destruction of wetland & creek in Gorai Essel world area.<br>दि. 17.04.2023 | • मा.अध्यक्षांनी जिल्हाधिकारी मुंबई उपनगर व विभागीय वन अधिकारी यांना पुढील बैठकीपूर्वी या तक्रारीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. | 1. जिल्हाधिकारी मुंबई उपनगर<br>2. विभागीय वन अधिकारी |

| | | | |
|---|---|---|---|
| **ठाणे जिल्हयातील कांदळवन तक्रारी** | | | |
| 4 | **श्री. स्टॅलिन डी** (WC- 81) Reclamation of Wetlands on the Left side of Kharigaon Toll Plaza as one drives from Thane to Kalyan. Date - 20.01.2020 | • ठाणे महानगरपालिका यांचे दि.21.07.2022 रोजीच्या अहवालानूसार सदर जागा वनविभागाच्या अधिपत्याखाली असून, विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक यांच्या विभागातर्फे कोणतेही फलक अथवा सिक्युरिटी गार्ड तेथे उपलब्ध नाही. त्यामुळे मोठया प्रमाणात तेथे भरणी होते. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार भरणी काढण्याबाबत महानगरपालिकेला आदेश दिले जातात. भरणी काढण्यासाठी मोठया प्रमाणात निधीची आवश्यकता असल्याने महापालिका स्तरावर त्याबाबत जास्त कालावधी लागत असल्याचे नमुद केले आहे.<br>• तक्रारदाराने नमुद केल्यानुसार मा. विभागीय आयुक्त यांनी कांदळवन संवर्धनासाठी अजून पुढील एक नैसर्गिक प्रवाह खुला करुन द्यावा, याप्रमाणे आदेश दिले होते. त्याअनुषंगाने विभागीय वन अधिकारी, कुर्ला यांना ठामपा/प्रनिक/209/2022-23 दि.17.06.2022 रोजीच्या पत्रान्वये परवानगी मिळण्याबाबत कळविण्यात आले होते.<br>• तथापि ठाणे महानगरपालिका यांचे दि.05.07.2023 रोजीच्या अहवलानूसार वन विभागाच्या दि.28.09.2021 रोजीच्या परवानगीने 10 मी खोल व 30 मी लांब ट्रेन्च खोदून दिला असून त्याबाबतचा अहवाल कोकण विभागीय आयुक्त यांना दि.21.01.2022 रोजी कळविले आहे.<br>• मा.अध्यक्षांनी विभागीय वन अधिकारी, कुर्ला यांना पुढील बैठकीपूर्वी या तक्रारीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. | 1. विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक |
| 5 | **श्री. सुनील अगरवाल** (WC- 92) Mangroves and Wetlands destruction near Hiranandani Estate Thane. Date - 04.12.2021 | • मा.अध्यक्षांनी जिल्हाधिकारी ठाणे यांना पुढील बैठकीपूर्वी या तक्रारीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. | 1. जिल्हाधिकारी, ठाणे |
| 6 | **श्री. सुनील अगरवाल.** (WC- 96) Violation of CRZ rules & Indian Wildlife Protection Act in Sector 60, Nerul Navi, Mumbai. | • सिडको यांच्या दि.30.11.2021 रोजीच्या अहवालानुसार या तक्रारीप्रमाणे NRI (नेरुळ) येथील वसाहती जवळील प्रस्तावित गोल्फ कोर्स जागेजवळील भूखंडाची तक्रारदारांच्या समवेत दि.11.11.2021 रोजी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करण्यात आली असून सिडको महामंडळाच्या विकास आराखडयाप्रमाणे सदरहू जागा गोल्फ कोर्स प्रकल्पासाठी प्रस्तावित आहे. त्या पॉकेट मधील D व E भागात कोणत्याही प्रकारचे काम चालू नाही व काही भागात पाणी साठलेले आहे. त्या पाण्यामध्ये कोणत्याही प्रकारचा भराव केलेला नाही तसेच | 1. संचालक, पर्यावरण विभाग |

| | | | |
|---|---|---|---|
| | [illegible] | [illegible] आहे.<br>• **सदरची तक्रार ही सुप्रिम कोर्टात देखील चालू आहे.**<br>• समितीने या तक्रारीबाबत संचालक, पर्यावरण विभाग यांना उचित कार्यवाही करुन अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या. | |
| 7 | **श्री. स्टॅलिन डी** – (WC- 102) Blockage of tide water by CIDCO in Survey Number 265 Nerul. Date – 08.10.2022. | • मा.अध्यक्षांनी जिल्हाधिकारी ठाणे तसेच सिडको यांना पुढील बैठकीपूर्वी या तक्रारीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते.<br>• त्याअनुषंगाने सिडको कार्यालयाच्या दि.17.07.2023 रोजीच्या अहवालानूसार, सदर जागेवर काही स्थानिक मच्छीमार समाजातील लोकांनी लाकडी झडपे लावून समुद्राच्या पाण्याची भरती व आहोटी दरम्यान संचालन करत असल्याचे निदर्शनास आले. यात त्यांचा मच्छीमारांचा हेतू असल्याचे आढळून येत असून या ठिकाणी सिडको ने भू-विकासाचे कुठलेही कार्य हाती घेण्यात आलेले नसल्याचे नमूद केले आहे.<br>• सोबत सहा. कार्यकारी अभियंता (वाशी), सिडको यांचा स्थळपाहणी अहवाल जोडण्यात आलेला आहे. | 1. जिल्हाधिकारी, ठाणे |
| 8 | **श्रीमती श्रुती अग्रवाल** दि. 28.02.2023 **व श्री. स्टॅलिन डी. दि.** 01.03.2023 **श्री. प्रदीप पाटोले दि.**16.05.2023 (WC-105)<br>1.Blockage of water in the wetlands behind NRI complex.<br>2.Survey No.22 a huge Mangrove patch is in possession of CIDCO. | | |
| 9 | **श्री.निशांत बांगेरा** – (WC - 104) Reclamation of Railadevi Lake, Thane | • सदस्य सचिव तथा उपवनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचे मार्फत दि.22.02.2023 रोजीच्या पत्रान्वये स्थळ पाहणी अहवाल संबंधीत अधिकारी यांचेकडून मागविण्यात आला होता.<br>• त्या अनुषंगाने मा.अध्यक्षांनी पुढील बैठकीपूर्वी या तक्रारीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याचे निर्देश संबंधीत अधिकाऱ्यांना दिले. | जिल्हाधिकारी, ठाणे |

| अ.क्र | तक्रार क्र. व तक्रारीचा विषय | करावयाची कार्यवाही | कार्यवाही करणारी यंत्रणा |
|---|---|---|---|
| | | **रायगड जिल्हयातील कांदळवन तक्रारी** | |
| 10 | **श्री.स्टॅलिन डी.** **(WC- 87)** Destruction of coastal Wetlands in Kharghar Sector 16. दि. 05.01.2021 | • सिडको यांच्या दि.31.03.2023 रोजीच्या अहवालानूसार सदर क्षेत्र पनवेल महानगरपालिकेत हस्तांतरीत केल्यामुळे याबाबत कार्यकारी अभियंता (प्रकल्प) पनवेल, पनवेल महानगरपालिका यांस सदर तक्रार वर्ग करण्यात आली आहे.<br>• तथापि सिडको अधिकाऱ्यांच्या दि.08.03.2023 रोजीच्या संयुक्त स्थळ पहाणी दरम्यान सदर जाळया श्री. मुझाम्मिल पटेल व इतर यांच्या असल्याचे समजले असून, दि.23.03.2023 रोजीच्या नियंत्रक, अनाधिकृत बांधकामे यांच्या अहवालानूसार सदर जागेवरील जाळया काढण्यात आलेल्या असून सोबत सदर जागेचे छायाचित्रे जोडण्यात आले असल्याचे नमूद केले आहे. | 1. व्यवस्थापकीय संचालक, सिडको |
| 11 | **श्री. स्टॅलिन डी –** **(WC- 100)** Wetlands already eliminated in defiance of court orders to protect and ones that are presently being destroyed. Date -12.07.2022. | • जिल्हाधिकारी रायगड यांचे दि.02.11.2022 रोजीच्या अहवालानूसार **मौजे पाणजे**, ता.उरण, जि. रायगड येथील जागा वेटलँड नियम, 2010 नुसार वेटलॅडच्या यादीत समाविष्ट **नाही.** तसेच पाणथळ म्हणून अधिसूचित केलेली **नाही.**<br>• तसेच **मौजे भेंडखळ, मौजे बोकडविरा, मौजे सावरखार, मौजे जासई,** ता.उरण, जि.रायगड येथील जागा वेटलँड नियम, 2010 नुसार वेटलॅडच्या यादीत समाविष्ट **आहे**. परंतु पाणथळ म्हणून अधिसूचित केलेली नाही.<br>• त्याअनुषंगाने समितीच्या निर्देशानूसार उचित कार्यवाही करण्यात येईल. | 1. जिल्हाधिकारी, रायगड<br>2. उपवनसंरक्षक अलिबाग, जि.रायगड |
| 12 | **श्री. स्टॅलिन डी –** **(WC- 101)** Please Stop Reclamation and destruction of belpada Wetland. Date – 28.09.2022 | • मा.अध्यक्षांनी जिल्हाधिकारी रायगड यांना पुढील बैठकीपूर्वी या तक्रारीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. | 1. जिल्हाधिकारी, रायगड |
| 13 | **श्री. बी.एन.कुमार –** **(WC - 103)** 10 acres of Kharghar wetland systematically buried Date : 04.01.2023. | • सिडको यांच्या दि.24.05.2023 रोजीच्या स्थळपाहणी अहवालानूसार सदर भूखंडावर कुठल्याही प्रकारची बांधकाम परवानगी देण्यात आलेली नाही तसेच रग्बी मैदानावर कुठलेही बांधकाम झालेले नसल्याचे नमूद केले आहे. सोबत स्थळपाहणी अहवालाचे छायाचित्रे जोडण्यात आलेली आहेत.<br>• जिल्हाधिकारी रायगड यांचे दि.06.07.2023 रोजीच्या अहवालानूसार सदर तक्रारीत नमूद मौजे खारघर सेक्टर 25 येथील प्लॉट रग्बी इंडिया यांना ग्राऊंडकरीता दिलेला आहे अशा आशयाचा बोर्ड जागेवर लावण्यात आला आहे. सदर जागेची स्थळपाहणी केली असता, सदर जागेवर कोणत्याही प्रकारचा | - |

| | | | |
|---|---|---|---|
| | | जागेभोवती तारेचे कुंपन असून सदर जागेमध्ये तसेच जागेच्या भोवतालच्या परिसरात कांदळवनाचा ऱ्हास झाल्याचे दिसून आले नसल्याचे नमूद केले आहे.<br>• सदर तक्रारीमध्ये नमूद मौजे तळोजे पाचनंद येथील स.नं.261, 262, 267, 268 व 270 चे कब्जेदार सदरी महाराष्ट्र शासन सिडको असून सदरच्या जमीन मिळकती गाव नकाशानुसार तळोजे खाडी किनारी असल्यामुळे जमिनीच्या हद्दी मोजणी अंती स्पष्ट होतील. परंतु सदर क्षेत्राची आजरोजी पाहणी केली असता, तळोजेचे कार्यक्षेत्रामध्ये कांदळवनाचा ऱ्हास झाल्याचे दिसून आले नसल्याचे नमूद केले आहे.<br>• त्याअनुषंगाने मा.अध्यक्षांच्या निर्देशानूसार सदर तक्रारी संदर्भात पुढील निर्णय घेण्यात येईल. | |
| 14 | **श्री.बी.एन.कुमार**<br>**(WC-106)**<br>NMSEZ IT Hub on Mangrove-wetland graves-Request to stop it.<br>दि : 08.03.2023 | • जिल्हाधिकारी रायगड यांचे दि.30.05.2023 रोजीच्या अहवालानूसार सदर जागेची दि.11.05.2023 रोजी प्रत्यक्ष पाहणी केली असता, सदरची जागा सिडको संपादीत असून द्रोणागिरी डेव्हलपमेंट प्लॅनमधील सेक्टर 16 ते 28 या NMSEZ यांचे ताब्यातील जमीन आहे. सदर ठिकाणी आजरोजी कोणत्याही प्रकारचे IT संबंधित Hub चे काम सुरु नाही. त्यामुळे वेटलँड किंवा कांदळवनाचा ऱ्हास झाल्याचे दिसून येत नाही.<br>• तसेच, सदरची जागा ही वेटलँड (संवर्धन आणि व्यवस्थापन) नियम, 2010 नुसार वेटलँड या यादीत समाविष्ट नाही. सबब, सदर जागेची तपासणी केली असता सदर जागेवर कांदळवन तोड झालेली नाही.<br>• मा.अध्यक्षांनी सिडको व विभागीय वन अधिकारी, मुं.कां.सं.घ, कुर्ला यांना पुढील बैठकीपूर्वी या तक्रारीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. | 1. व्यवस्थापकीय संचालक, सिडको<br>2. विभागीय वन अधिकारी, मु.कां.सं.घ, कुर्ला. |
| 15 | **श्री. बी.एन.कुमार**<br>**(WC-111)**<br>Reclamation of Dastan, Savarkhar intertidal waters complete.<br>दि. 23.04.2023 | • जिल्हाधिकारी रायगड यांचे दि.14.07.2023 रोजीच्या अहवालानूसार 1) दास्तान फाटा शिव स्मारक ते करळ जंक्शन जुना पनवेल – उरण रस्ता 348A च्या पुर्व बाजुला जे.एन.पी.टी. यांचे नावे असलेल्या जमिनीमध्ये खाजगी विकासक खारपाटील, म्हात्रे व ठाकूर यांना 12.5 % योजनेकरीता भूखंड तयार करणेकामी दिलेला असून सदर विकासकांनी शिवस्मारक ते करळ जंक्शन पर्यंत अंदाजे 3.5 कि.मी. एवढया लांबीच्या जागेमध्ये अंदाजे 7 फुट उंच माती, दगड, मुरुम यांचा भराव केलेला आहे. 2) तसेच सावरखार येथील जे.एन.पी.टी. ब्रिजच्या पश्चिम बाजुला जे.एन.पी.टी. च्या नावे असलेल्या जमिनीमध्ये माती व डेब्रिजचा भराव केलेला असून सदर जागेमध्ये बांध घालून पाण्याची डबकी तयार केलेली आहेत. सदर जागेवर यापूर्वी भराव केलेला आहे.<br>• वर नमूद केलेल्या दोन्हीही जागा जे.एन.पी.टी. यांच्या मालकीच्या असून सदर जागेवर जे.एन.पी.टी. मार्फत विकास कामांकरीता वापर सुरु असल्याचे नमूद केले आहे. | 1. जवाहरलाल नेहरु पोर्ट ॲथोरीटी, नवी मुंबई |

| | | | |
|---|---|---|---|
| पालघर जिल्हयातील कांदळवन तक्रारी | | | |
| 16 | **श्री. दामोदर शिंगडा** (WC-86) वसई तालुक्यातील मौजे धोवली येथे पाणथळ क्षेत्रातील समुद्राला लागून असलेल्या सर्वे नं. १०९ ते सर्वे नं.११५ मधील ५० एकर पेक्षा जास्त पाणथळ जागेतील तिवरे / कांदळवन कापून बेकायदा भराव केल्याबाबत. Date - 26.12.2022 | • मा.अध्यक्षांनी जिल्हाधिकारी पालघर, वसई–विरार महानगरपालिका तसेच उपवनसंरक्षक, डहाणू वन विभाग, पालघर यांना पुढील बैठकीपूर्वी या तक्रारीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. | 1.आयुक्त, वसई-विरार, मनपा<br>2. जिल्हाधिकारी पालघर<br>3. उपवनसंरक्षक, डहाणू वन विभाग, पालघर |
| 17 | **श्री. निलेश विनायक जोशी (WC- 95)**<br>पालघर जिल्हयातील वसई तालुक्यातील, वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती एच येथील दिवाणमान परिसरातील CRZ Area - No Development Zone मधील बांधकाम अनधिकृत यादीत नसल्याबाबतची तक्रार.<br>Date - 21.12.2021 | • सदर विषय पर्यावरण विभागाशी संबंधित असल्याने मा. अध्यक्षांनी सदर तक्रार पुढील कार्यवाहीसाठी संचालक, पर्यावरण विभाग यांचेकडे वर्ग करण्याचे निर्देश दिले. | 1. संचालक, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई<br>2. आयुक्त, वसई-विरार शहर महानगरपालिका<br>3. जिल्हाधिकारी पालघर |
| 18 | **श्री.दिपक बारीया**<br>(WC-107)<br>तत्कालीन वसई तहसिलदार यांनी "पाणथळ तक्रार निवारण समिती" यांना सादर केलेले खोटे अहवाल व आरोपीत इसमासोबत स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी संगनमत करुन शासकीय कर्तव्य बजावण्यात केलेला कसूर ह्या बाबत. दि. 26.03.2023 | • मा.अध्यक्षांनी जिल्हाधिकारी पालघर व उपवनसंरक्षक, डहाणू वन विभाग, पालघर यांना पुढील बैठकीपूर्वी या तक्रारीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. | 1. जिल्हाधिकारी पालघर<br>2. उप वनसंरक्षक, पालघर |
| 19 | **श्री.फ्रान्सिस डिसोजा**<br>(WC-108)<br>भुईगाव खुर्द व बुद्रुक हद्दीतील सरकारी मालकीच्या सर्व्हे नं.164 या पाणथळ खार जमिनीवर बेकायदा भराव व बेकायदा रस्त्याचे बांधकाम करीत असलेल्या गुन्हेगारांवर | • मा.अध्यक्षांनी जिल्हाधिकारी पालघर व उपवनसंरक्षक, डहाणू वन विभाग, पालघर यांना पुढील बैठकीपूर्वी या तक्रारीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. | 1.जिल्हाधिकारी पालघर<br>2. उप वनसंरक्षक, डहाणू वन विभाग, पालघर |

| | | | |
|---|---|---|---|
| | करणेबाबत.<br>दि. 31.03.2023 | | |

**कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीच्या दि.10.08.2023 रोजीच्या बैठकीतील तक्रारींचा सद्यस्थितीचा जिल्हानिहाय गोषवारा**

| जिल्हा | एकूण तक्रारी | निकाली काढण्यात आलेल्या तक्रारी | प्रलंबित तक्रारी |
|---|---|---|---|
| मुंबई शहर | 0 | 0 | 0 |
| मुंबई उपनगर | 3 | 0 | 3 |
| ठाणे | 4 | 0 | 4 |
| पालघर | 4 | 0 | 4 |
| रायगड | 8 | 0 | 8 |
| रत्नागिरी | 0 | 0 | 0 |
| सिंधुदुर्ग | 0 | 0 | 0 |
| **एकूण** | 19 | 0 | 19 |

(डॉ. महेंद्र कल्याणकर)
**अध्यक्ष,**
**कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती**
**तथा विभागीय आयुक्त, कोकण विभाग**